# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**


क्र.मप्राशिप/समग्र शिक्षा/राप्रसं/संगणक/2018-19/३२८० 19 DEC 2018

प्रति,

(१) शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई.

(२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, सर्व.

(३) शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, सर्व.

विषय : **शाळांमध्ये शैक्षणिक उपलब्धता व उपयोगितेबाबत माहिती भरणेबाबत.**

राज्यातील सर्व शाळांमध्ये शैक्षणिक तंत्रज्ञान (उदा.संगणक, टिव्ही, LCD/LFD Screen, Projector, Laptop इ.) कमी-जास्त प्रमाणात उपलब्ध असल्याचे समजते. मात्र, याबाबत राज्य स्तरावर शाळानिहाय माहिती (data) संकलितपणे उपलब्ध नाही. त्यासाठी या कार्यालयाने डिजिटील शाळांच्या माहितीसाठी लिंक विकसित केली आहे. राज्यातील सर्व शाळांमध्ये उपलब्ध असलेले शैक्षणिक तंत्रज्ञान, ई-आशय, विद्युत सुविधा, तंत्रस्नेही शिक्षक इ.ची माहिती http://www.research.net/r/8MRR5HJ या लिंकवर प्रत्येक शाळांनी भरावयाची आहे. या लिंकवर नमूद केलेल्या सर्व क्षेत्रांची माहिती **दि.31.12.2018 पर्यंत** भरण्याच्या सूचना आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शाळांना देण्यात याव्यात. याकामी समन्वय, संकलन, पाठपुरावा व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी समग्र शिक्षामधील संगणक प्रोग्रामर, MIS Coordinator, डाटा एंट्री ऑपरेटर यांना सहभागी करून घेण्यात यावे. सर्व शाळांची शैक्षणिक तंत्रज्ञानविषयक माहिती दि.31.12.2018 पर्यंत वरील लिंकवर प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे शाळांना आवश्यक ते शैक्षणिक तंत्रज्ञान, डिजिटल साहित्य इ.बाबी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य स्तरावरून नियोजन करता येईल. त्या अनुषंगाने आपण विहित मुदतीत वरील लिंकवर आवश्यक माहिती सर्व शाळांकडून भरली जाईल, याची खात्री करावी. जेणेकरून पुढील आर्थिक वर्षासाठी डिजिटल शाळा करण्यासाठी योग्य ते नियोजन व अंदाजपत्रक तयार करून भारत सरकार व राज्य शासनाकडे सादर करता येईल.

(वंदना कृष्णा, भाप्रसे),<br>
राज्य प्रकल्प संचालक,<br>
म.प्रा.शि.प., मुंबई तथा<br>
अपर मुख्य सचिव,<br>
शा.शि. व क्री.वि., मंत्रालय, मुंबई

प्रत माहितीस्तव सादर,

(१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई 400 032.




सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

(२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई 400 032.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव,

(१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

(२) आयुक्त, महानगरपालिका, सर्व.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.